5 November 2009

## – अक्षरब्रह्मयोग –

### अध्याय - ८ वा

सातव्या अध्यायाची संगता करताना भगवंतांनी ज्ञानविज्ञानात्मक अशा सप्त संज्ञा सांगितल्या शेवटच्या दोन श्लोकात ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ या संज्ञा सांगितल्या आणि प्रयाणकाळी येण्यांना होणारे भगवंताचे स्मरण या बद्दल सांगितले.

अर्जुन हा विचक्षण आणि तैलबुद्धी श्रोता आहे. तो लक्षपूर्वक ऐकतो आणि शंका विचारतो. चित्तशुद्धीमुळे श्रद्धा अधिकाधिक दृढ होते. उत्कट भाव महत्वाचा बाकी सगळ्या गोष्टी गौण आहेत. तुम्ही पूजा-अर्चा, यज्ञ-याग काहीही करा परंतु त्यामागची भक्ती निर्मळ हवी भाव उत्कट हवा तो असल्याशिवाय परमेश्वराचे दर्शन होणार नाही.

अर्जुन हुशार आहे परंतु त्याच्या अंतःकरणात अजून आत्मज्ञानाचा प्रवेश झालेला नाही म्हणूनच तो प्रश्न विचारतो.

(१) (२) हे पुरुषोत्तमा! ज्याचे वर्णन आपण केले ते ब्रह्म म्हणजे काय आहे? व अध्यात्म म्हणजे काय? तसेच कर्म म्हणजे काय आणि अधिभूत म्हणजे काय? अधियज्ञ आणि अधिदैव कशाला म्हटले जाते? आणि युक्तचित्त असलेल्या पुरुषाकडून तुम्ही अंतकाळी कशाप्रकारे जाणले जाता?

(३) यावर भगवंत उत्तर देतात - अक्षर हेच ब्रह्म आहे.

©www.madhaveeraghuveer.com

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

क्षर - द्वंद्वात्मक, विनाशी
अक्षर - निर्द्वंद्व, अविनाशी, निरुपाधिक.
प्रणव/ॐकार हाच ब्रह्म आहे कारण तो स्वयंभू आहे.

स्वभाव म्हणजे ब्रह्मभाव

१. वर्णगत स्वभाव - हा जन्मजात असतो.
२. उत्पादित स्वभाव - हा जाणीवपूर्वक निर्माण करावा लागतो.
३. ज्ञानी स्वभाव - ही सहजस्थिती असते. यामध्ये अद्वैताचा एकरस अनुभव असतो.

कर्मसंज्ञित:

भूतांच्या भावाचा जो त्याग त्याला कर्म म्हणावयाचे. कल्पक्षय आणि कल्पारंभ या दोन्ही मध्ये जे काही अंतर आहे तिथे भगवत्संकल्प असतो. त्यातून प्राणिमात्र जन्माला येतात त्याला सगळ्या भूतांचा भाव निर्माण होत असतो पुन्हा प्रलय झाला की सगळी प्रकृती तिच्या गुणासहित त्याच्यात मिसळून जाते. भगवंतांचा संकल्पविकल्प हा विश्वात्मक आहे. ब्रह्मांडात्मक आहे. म्हणून त्याच्या संकल्पामुळे सृष्टीची निर्मिती व्हायला प्रारंभ होतो. स्थूलमानाने असे म्हणता येईल की हे पंचमहाभूतांचे घटक निर्माण होतात; वनस्पती निर्माण होतात; मग हळूहळू प्राणी संपत्ति निर्माण होते आणि शेवटी मनुष्य प्राणी निर्माण होतो. हे चक्र अखंड चालत रहाते. ∴ भगवत्संकल्प हाच कल्पारंभ।

© www.madhaveeraghuveer.com

थोडक्यात परम अविनाशी ते ब्रह्म होय.
आपल्या सहजस्थितीने ब्रह्माची असलेली नित्यता
व अखंडता हेच अध्यात्म आणि अक्षर
ब्रह्मापासून भूतमात्रादि चराचर पदार्थांची
उत्पत्ति करणारा जो सृष्टीव्यापार ते कर्म होय.
(४) अधिभूत - प्रतिक्षण परिवर्तनशील असलेली
पंचमहाभूतात्मक नाशिवंत सृष्टी म्हणजे अधिभूत
होय. जे क्षर म्हणजे विनाशी आहे त्याला
अधिभूत म्हणायचे. त्याला आदि, अंत आहे. त्याला
रूप आहे नाम आहे. हे सर्व दृश्य विश्व मिथ्या
आहे. जे जे दिसे ते ते नासे।
शंकराचार्य - शिष्य - प्रवचन
बाध - मिथ्या, मरून जाणे देखील मिथ्या.
अधिदैव - पुरुष म्हणजे हिरण्यगर्भ
सर्व सृष्टीचा चालक म्हणजे जीवात्मा आहे.
अधिदैव म्हणजे तो पुरुष किंवा जीवात्मा होय.
अधिदैव म्हणजे पुरुष - हा प्रकृतीने निर्मिलेले
भोग भोगतो. जो चेतनेचा प्रकाशक आहे,
जो इंद्रियरूपी देशाचा स्वामी आहे. तो
वास्तविक परमात्माच आहे परंतु अहंकारामुळे
तो वेगळा भासतो.
अधियज्ञ - म्हणजे साक्षात ईश्वरच !
या शरीररूपी गावामध्ये जो शरीरभावाला
(देहाहंकारादि) नाहीसे करतो तो या शरीरातील
अधियज्ञ आहे. मीच सर्व प्राण्यांच्या हृदयात

Sunday 25

© www.madhaveeraghuveer.com

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

अंतर्यामीपणाने स्थित आहे. माझ्यापासूनच
स्मृती, ज्ञान, अपोहन ही होतात. सर्व वेदांच्या
द्वारे मीच जाणावयास योग्य आहे ~~१५.१५~~

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५.१५

वर अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नातील सहा
संज्ञांचे वर्गीकरण तीन वर्गात करता येईल.

उपास्य - ब्रह्म, अधियज्ञ
उपासक - अध्यात्म, अधिदैव
साध्य - कर्म, अधिभूत

अर्जुन हा नर आहे. म्हणजे विषयांमध्ये
न रमणारा आहे ∴ त्याला 'देहभृतां वर'
असे म्हटले आहे.

(५) जीवनाचे गणित पारमार्थिक असावे.
माणूस नेहमी चांगल्याचे स्मरण ठेवतो आणि
वाईट विसरण्याचा प्रयत्न करतो. हे खरे
असले तरी हे जे चांगले आहे ते भौतिक
असू नये पारमार्थिक असावे.
एखाद्या कीर्तन, प्रवचनातील विचार कसे
प्रभावी होते याचे स्मरण असावे, तेथील भोजन
(प्रसाद) कसा चविष्ट होते याची अधिक
चर्चा नको. चिंतन नेहमी पारमार्थिक असावे.
त्याचप्रमाणे मृत्युची भीती बाळगू नये परंतु

સ્મરણ કરણે હે ઓઠાંચે કામ નાહી તર મનાચે કાર્ય આહે. સ્મરણ કરતાના [illegible] વિચારાંની વૃત્તિ અંતઃકરણાત નિર્માણ વ્હાયલા હવી.

मृत्युचे अनुसंधान असावे.

या संदर्भात एकनाथ महाराजांची एक गोष्ट नेहमी सांगितली जाते - ७ दिवसांनी मृत्यु. कर्ममुक्ती.

१. अंतकाळी परमेश्वराचे स्मरण असावे
२. देहात्मबुद्धीला तिलांजली देणे
३. त्यामुळे उत्तम गती लाभणे
४. शेवटी ब्रह्मभावात विलीन होणे.

हीच कर्ममुक्ती होय.

(६) देह जरी पडला तरी उपासक ~~मोक्षमात्र~~ शुभ संस्कारांमुळे माझ्याच भावामध्ये मिसळून जातो. अंतसमयीचा भाव महत्त्वाचा. जो माणूस ज्याच्या भावनेच्या ठायी अत्यंत आसक्त होतो त्याच भावाप्रत तो पावतो.

वासनाक्षय हाच खरा मोक्ष आहे.

मरणसमयी ज्यास जी वस्तू आठवते त्याच गतीला तो जातो.

तेव्हा मोक्ष प्राप्त व्हावा म्हणून काय करावे? अंतकाळी मुख्यात ईश्वराचे नाम यावे. ते एकदम कसे जमेल? तर त्यासाठी आधी सराव असला पाहिजे नामस्मरणाचाही अभ्यास करावा. ईश्वराला नित्य स्मरावे. म्हणजे तो सहजपणे आठवेल.

एखादा मुलगा जेव्हा नवीन सायकल चालवायला शिकतो तेव्हा पूर्ण अवधान तिकडेच असते परंतु एकदा सवय झाली की मुद्दाम लक्ष द्यावे लागत नाही.

अंती मती सोचि गती । ऐसे सर्वत्र बोलती ।
तुका अंती तुही मती । [illegible] जाती ॥८.८.४८॥

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

सवयीने एकीकडे बोलता बोलता सुद्धा सायकल चालवता येते. ही कला, तो अभ्यास अंगात मुरला पाहिजे. असेच जर नियमितपणे नामस्मरण झाले तर अंतकाळीसुद्धा ईश्वराचे नाम मुखात येईल आणि मोक्षाचा मार्ग सापडेल. म्हणून म्हातारपण येण्यापूर्वीच ईश्वराचे नामस्मरण नियमितपणे करायला हवे. नाहीतर

बालस्तावत्क्रीडासक्तः तरुणस्तावत्तरुणीरक्तः।
वृद्धस्तावच्चिन्तामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः॥

अशी गत व्हायची. किंवा

लड़कपन खेलमें खोया जवानी नींदभर सोया
बुढापा देखकर रोया
यही किस्सा पुराना है।

असेही कवी म्हणतात.

म्हणून नित्य स्मरण असावे.

स्मरण तीन प्रकारचे १. बोधजन्य २. संबंधजन्य ३. क्रियाजन्य.

स्मरणाच्या चार पायऱ्या आहेत.

१. प्रापंचिक कामे करताना ईश्वराला स्मरणे. कनिष्ठ
२. ईश्वराला स्मरून कार्य करणे. मध्यम
३. कार्यच ईश्वरमय होणे उत्तम
४. ईश्वर हृदयात प्रस्थापित होऊन ईश्वरभावच प्रत्येक कर्मात येणे ही सर्वोत्तम पायरी आहे.

(८) अभ्यास हे शास्त्र आहे. मन चंचल असले तरी अभ्यासाने मनावर विजय मिळवता येतो.

कवि हे क्रांतदर्शी असतात
जे न देखे रवि ते देखे कवि।

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| December | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

2009

October
Thursday
Week 44
302-063
29

असाध्य ते साध्य। करिता सायास।
कारण अभ्यास। तुका म्हणे॥

वरकरणी अशक्य वाटणारी गोष्ट अभ्यासाने साध्य होते नदी जशी सागररूप होते तसे चित्त चिद्‌रूप करावे. अभ्यासाच्या पुनरावृत्तीने कर्मांना विश्रांती मिळते, आणि खरा भगवंत वश होऊन आत्मशांती लाभते.

खरा अभ्यासाला ब्रह्म सजातीय आहे आणि प्रपंच विजातीय आहे.

म्हणून ज्ञाने प्रपंचाचे निरसन करावे आणि ब्रह्मचिंतन अखंड करावे. तसे झाले की वृत्ती भगवंतमय होतात. मनोवृत्ती आत्माकार होतात. असा उपासक परमात्म्यात मिसळतो.

या निशा सर्वभूतानां ................ पश्यतो मुनेः॥

(८)(१०) अभ्यासयोगयुक्त उपासक ज्या दिव्य पुरुषाला जाऊन मिळतो त्याचे वर्णन –

कवी – सर्वज्ञ, पुराणपुरुष – आदि आहे. तो अणुहून अणु म्हणजे सूक्ष्मतम आहे ∴ सर्वव्यापी आहे. तो शास्ता आहे म्हणजे त्याच्या नियंत्रणाखाली ही सगळी ब्रह्मांडे निर्माण होतात. त्याचे नियंत्रण महत्त्वाचे!

परमात्म्याचे स्वरूप – आदित्यवर्ण
चैतन्याचा धवल प्रकाश, दिव्य तेज
अनाहतध्वनी ऐकणे. अवघ्या ब्रह्मांडातील वेगवेगळे समस्त ध्वनी एकत्रित होऊन एक विराट प्रणवध्वनी

Omniscient, Omnipotent, Omnipresent

© www.madhaveeraghuveer.com

पुराण - सदैव सौम्य इदमग्र आसीत्
एकमेवाद्वितीयं ब्रह्म



| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

9.00 प्रतिक्षणी भगवान आपोआप उदित होत आहे असा
रामकृष्ण परमहंसांना प्रत्यय झाला होता. त्या
10.00 काळात त्यांना पशुपक्ष्यांच्या आवाजाचा अर्थ
बरोबर कळत असे.
11.00 (११) वेद जाणणारे विद्वान ज्याला ओंकार
नामाने वर्णितात. प्रयत्नशील महात्मा लोक
12.00 ज्याच्या ठिकाणी प्रवेश करतात तसेच ज्या
परमपदाचे इच्छुक ब्रह्मचर्याचे आचरण करतात
1.00 ते परमपद तुला संक्षेपाने सांगतो.
या अक्षर परब्रह्माची अनुभूती घेतलेले
2.00 वीतरागी असतात. आसक्तीविरहित असतात.
धगधगित वैराग्य धारण करतात.
3.00 ब्रह्मचर्य हे महाव्रत आहे.
अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह.
4.00 ब्रह्मचर्य जर नसेल तर इतर साधने
यथोचित आचरली जाऊ शकत नाही आणि
5.00 जर ब्रह्मचर्य उत्तम रीतीने पाळले तर इतर
अंगांचे अनुष्ठान अधिक सुकर होते असे
6.00 श्रुती-स्मृती सांगतात.
(१२) (१३) सर्व इंद्रियांच्या द्वारांना आवरून मनाला
7.00 हृदयदेशी स्थिर करून व आपल्या प्राणाला
मस्तकात स्थापन करून योगधारणेत स्थित राहून
8.00 जो पुरुष ॐ असा या एकाक्षररूप ब्रह्माचे
उच्चारण करीत आणि त्याचा अर्थस्वरूप माझे
चिंतन करीत शरीराला सोडून जातो तो पुरुष

Oh God, Reveal thyself in my every action!



2009

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| December | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

परमगतीप्रत पावतो.

द्वारांचे नियमन म्हणजे त्यांना त्यांच्या विषयापासून निवृत्त करावयाचे. - प्रत्याहार

महात्म्याचा देह पडताना ईश्वरच सहाय्यकर्ता होतो.

(१४) अनन्यचेताः अव्यभिचारी भाव
नित्यशः यावज्जीवन
सतत निरंतर
नित्ययुक्त - सतत अनुसंधान.

(१३) वार्धक्यात इंद्रियांचे सामर्थ्य हरवते अशा वेळी इंद्रियांचा निग्रह करून योगसाधना कशी करता येईल? याचे उत्तर देताना ज्ञानोबा म्हणतात.
तैं नित्य सेविली मी निकानी । सेवकु होय ॥
जे माझी नेमीच सेवा करतात त्या भक्तांच्या मरणकाळी मी त्यांचा सेवक होतो.

(१४) जे जे कर्म मी करतोय ना ते परमेश्वरा तुझेच कार्य नव्हे काय? हा भाव निर्माण होणे याला म्हणायचे क्रियास्मरण आणि हे क्रियास्मरण सुद्धा शेवटी अशा अत्युच्च भावनेवर न्यायचे असते की ज्यावेळी सगळाच भाव ईश्वरार्पणमस्तु झालेला असतो. हा एवढा ब्रह्मांडाचा पसारा आहे हा जो विश्वात्मक यज्ञ चाललेला आहे त्याची मी एक समिधा देतोय. तो यज्ञ केल्यावर आदित्य सुप्रतिष्ठित होतो असे म्हटले आहे.



© www.madhaveeraghuveer.com

| October Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| November Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

आदित्यात् जायते वृष्टि वृष्टेरन्नं ततः प्रजा
हे चक्र जर चालू रहायचे असेल तर आपल्याला ईश्वराला शरण जायला लागते आणि म्हणून मग अनन्यचेतस व्हावे लागते.

असा उत्तमोत्तम भक्त म्हणून उद्धवाचे नाव घेता येईल.

(१५) अनन्यचित्त भक्ताला पुनर्जन्म नाही.

पुनर्जन्म म्हणजे दुःखालय

खऱ्या उपासकाने प्रपंच म्हणजे विकाररूपी वृक्षांची बाग आहे हे नित्य स्मरावे. त्यामुळे प्रपंचाची आसक्ती टाकून जीवात्मा परमात्म्याकडे धावतो. तात्पर्य —

ज्ञानी, योगी, भक्त सर्वांनाच मुक्ती आहे. पण मार्ग भिन्न आहेत. ज्ञान्याचा अहंकार पूर्णतः लोप पावल्यामुळे त्याला ब्रह्मस्वरूपता (सद्योमुक्ती) लाभते. योग्याला योगमार्गाने प्राणाला भ्रूमध्यात स्थापन करून ॐकार उच्चारणाने देहत्याग करून परमपद लाभते, तर भक्ताला अनन्य भक्तीने, श्रद्धेने वासनाक्षयाद्वारे क्रममुक्ती लाभते.

केवळ परमात्म्यालाच प्राप्त होणारे मुक्ती मिळवतात. इतरांना पुन्हा जन्ममृत्युचक्रातून फिरावे लागते. हे भगवंत आता स्पष्ट करतात.

(१६) ब्रह्मलोकापासून इहलोकापर्यंत जेवढे म्हणून लोक आहेत आणि ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत जेवढे प्राणी आहेत ते पुनरावर्तिनः आहेत म्हणजेच त्यांना अंत आहे.

कल्पक्षय आहे. कल्पारंभी ते पुन्हा निर्माण होतात. अवघी सृष्टी नामरूपात्मक आहे. नामरूप नेहमी नाशिवंत असते.

ब्रह्मदेवाचा एक दिवस - ४ कोटी बत्तीस लाख वर्षे. तेवढीच त्याची रात्र असते.

त्यानंतरच्या महाप्रलयात ब्रह्मदेवाचाही नाश होतो.

(१७) काळाचे गणित किंवा यथार्थ तत्व जाणणारे ते अहोरात्रविद: आहेत.

ब्रह्मदेवाचा दिवस म्हणजे कल्प म्हणून प्रलयाला कल्पक्षय असे म्हटले आहे. आणि हे जो जाणतो तो अहोरात्रविद: आहे.

केवळ योगीजनच काळाच्या परिमाणांना जाणू शकतात. त्यातील सूक्ष्म भेद त्यांनाच ज्ञात असतात.

ब्रह्मलोक, गोलोक इं. दिव्य लोक स्वर्गाप्रमाणेच असून तेथे जाणाऱ्या पुण्यात्म्यालाही पुन्हा जन्म घ्यावाच लागतो.

| सप्त लोक — | भू: | भुव: | स्व: | मह: | जन: | तप: | सत्यम् |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | ↓ मानव | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ब्रह्मदेव ↓ |
| भाव — | अस्तित्व | ज्ञान | प्रकाश | महत्व | प्रजनन | सहनशक्ती | सत्यनिष्ठा |

यापैकी कोणत्याही लोकाची प्राप्ती झाली तरी शेवटी पुण्यक्षय झाला की जन्ममृत्यूच्या चक्रात यावेच लागते. मुक्ती केवळ आत्मज्ञानानेच लाभते केवळ पुण्याने नव्हे.

(१८) ब्रह्मदेवाच्या एका दिवसाला कल्प वा सर्ग असे म्हणतात. त्याचा एक दिवस ४ कोटी ३२ लाख वर्षांचा असतो.

© www.madhaveeraghuveer.com

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

सत्य, त्रेता, द्वापर आणि कलि अशी चार युगे मिळून एक महायुग होते.

ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मन्वंतरे होतात. या चौदा मनुंची नावे -

| | | |
|---|---|---|
| स्वायंभुव | स्वारोचिष | उत्तम |
| तामस | रैवत | चाक्षुष |
| वैवस्वत | सावर्णि | दक्षसावर्णि |
| ब्रह्मसावर्णि | धर्मसावर्णि | रुद्रसावर्णि |
| इंद्रसावर्णि | देवसावर्णि | |

आता वैवस्वत मन्वंतर चालू आहे.

प्रलय तीन प्रकारचे आहेत.

(१) नित्यप्रलय. या सृष्टीत प्रत्येक क्षणाला परिवर्तन होत असते. हे परिवर्तन अंतत: ऱ्हासाकडे नेणारे असते ∴ सृष्टीत प्रत्येक क्षणाला होणारा बदल हाच नित्यप्रलय किंवा दैनंदिन प्रलय!

(२) प्राकृतिक प्रलय - चार उपप्रकार

अ - मन्वंतर प्रलय - मनूचे परिवर्तन होताना

ब - अवांतर प्रलय - प्रत्येक युगाच्या प्रारंभी होणारा

क - दैनंदिन प्रलय - ब्रह्मदेवाची रात्र होते तेव्हा ,,

ड - महाप्रलय - ब्रह्मदेवाचे आयुष्य शेष झाल्यावर ,,

(३) आत्यंतिक प्रलय - तत्त्वज्ञानाने मोक्षप्राप्ती झाल्यावर पुनर्जन्म होत नाही त्यालाच आत्यंतिक प्रलय असे म्हणतात.

© www.madraveeraghuveer.com

(१९) कल्पक्षयातही कर्मसंचित नाश पावत नाही. ज्यांना मोक्ष लाभला आहे असे अशांचा अपवाद सोडला तर तीच जीवसृष्टी पुन्हा पुन्हा निर्माण होत असते. ∴ भूत्वा भूत्वा असा शब्दप्रयोग वापरला आहे.

या सर्व प्रलयात कोणाचा विनाश होत नाही? कोण अक्षर आहे? हे पुढे स्पष्ट करतात — पुढील २०, २१, २२ श्लोक महत्त्वाचे आहेत.

(२०) परमात्म्याचे यथार्थ रूप

(२१) सोन्याची लगड व अलंकार यांना आधारभूत हे सोनेच असते. त्याचप्रमाणे आकार आणि निराकार यांचा विचार चैतन्याच्या ठिकाणी आहे. ते चैतन्य साकारही नाही व निराकारही नाही.

ज्याप्रमाणे पाटीवर लिहिलेली अक्षरे पुसून टाकली तरी त्यापासून होणारा बोध नाहीसा होत नाही. त्याचप्रमाणे जे चैतन्य विश्वाच्या रूपाने बनलेले आहे ते विश्वपण नाहीसे झाले तरी चैतन्य नाहीसे होत नाही.

एकदा जीवात्मा परमगतीला गेला की संसारात पुन्हा येत नाही. लाकूड अग्नीत गेले की अग्निरूपच होते. ऊसाची साखर झाल्यावर पुन्हा त्याचा ऊस होत नाही. दुधाचे रूप " " दूध होत नाही.

तात्पर्य — आकाराला आल्यामुळे अव्यक्ताचा निराकारपणा जात नाही. आणि आकाराचा लोप झाला तरी त्याची नित्यता जात नाही. त्यालाच अक्षर म्हणतात तीच परमगती होय.

(२२) जीवात्मा - परमात्मा संबंध.

# 06 November Friday

Week 45
310-055

2009

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

9.00 (२२) त्या प्रयोजनाच्या सिद्धीचा उपाय. भक्तीचा गौरव यात केला आहे. ही परा भक्ती आहे
10.00 ती ज्ञानलक्षणा आहे. स्वरूपानुसंधान करणारी आहे.
हा परमात्मा अनन्य भक्तीने लाभणारा
11.00 आहे हे वाचून त्यांना ज्ञानमार्ग पेलणारा नाही त्यांना आनंद होतो परंतु ही भक्ती साधीसोपी
12.00 नाही- ही परा भक्ती आहे आत्मज्ञानाइतकीच ती आत्मसात करण्यास व आचरण्यास कठीण
1.00 आहे. तुकाराम महाराजांनी तिला सुळावरची पोळी म्हटली आहे.

2.00 अनन्यभक्ती - खरी भक्ती ही अनन्यच असते. पतिव्रता स्त्रीप्रमाणे खऱ्या भक्ताला ईश्वराशिवाय
3.00 दुसरा विषयच नसतो. अनन्य भक्त हा देवाला नेहमीच शरण असतो. परंतु ही शरणागतता
4.00 वरवरची नसावी. शरणागतीची दोन अंगे आहेत.

१) कर्तृतंत्र - स्वतःच्या कामासाठी परमेश्वराला
5.00 दंडवत घालणे, नामस्मरण करणे.

२) वस्तुतंत्र - आत्मसाक्षात्कार झाला की जीव
6.00 परमात्म्याशी तद्रूप होतो त्याठिकाणी द्वैत सरते. अद्वैत प्रस्थापित होते. असे पराविद्येचे ज्ञान किंवा
7.00 आत्मानुभूती म्हणजे वस्तुतंत्र शरणागती होय.

आपल्या सर्व वृत्ती परमेश्वराला अर्पण करणे
8.00 आणि चित्तात परमेश्वराशिवाय दुसरा कोणताही विषय न येणे यालाच अनन्य शरणता म्हणतात.

अनन्यभक्तीचा साधनाक्रम -
१. सत्संग - परमात्म्यात रुची व प्रपंचाचे वैयर्थ समजते.
२. श्रवण भक्तीची गोडी निर्माण होते.
३. भगवंताच्या सगुणलीला कीर्तन प्रवचनाद्वारे
४. सच्चिदानंदस्वरूप परमात्म्यात रुचि, प्रेम, भक्ति
५. अभ्यास व वैराग्य यामुळे भगवत्प्राप्तीची ओढ
६. अखंड गुरुसेवा - संदेह मावळतात.
७. यम - नियम - शुद्ध आचरण
८. देहात्मबुद्धी व अहंकाराचा नाश होतो.
९. शम दमादि संपत्तीने तत्वविचार घडतो.
१०. आत्म साक्षात्कार - सायुज्यमुक्ती
जीवात्मा परमात्म्यात मिसळतो.

(२३) देवयान व पितृयान -
जे ब्रह्माचे ध्यान करतात ते देवयानमार्गे जातात. त्यांना पुनरावृत्ती (पुनर्जन्म) नसते.
कर्म करणारे मात्र पितृयानमार्गाने जाऊन पुन्हा परत येतात.
देह टाकल्याबरोबर ईश्वररूप होणे किंवा जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडणे ह्या दोन्ही गोष्टी शरावेळ मरणवेळच्या स्वाधीन आहेत.



पितामह भीष्म हे त्यातील अनिवार्य शेनहदपर्यंत प्रबळ होते. उत्तरायण येईपर्यंत भीष्मांनी मृत्यु थांबवला होता.
(२४) अग्नि, ज्योति, दिवस आणि शुक्लपक्ष हे सर्व जर उत्तरायणांत जुळून आले तर ब्रह्मविद ब्रह्ममय होतो. मुक्ती मिळवतो. याला च अर्चिरादि मार्गही म्हणतात.

(२५) धूम्रमार्ग - पितृयान
धूम्र, रात्री, कृष्णपक्ष आणि दक्षिणायन असेल तर अशा कालखंडात मृत्यू पावलेले सकाम योगी चंद्रम्याच्या ज्योतीला प्राप्त होऊन (स्वर्गात आपल्या शुभकर्माचे फल भोगून) परत येतो.

(२६) वरील श्लोकात ज्या दोन गती सांगितल्या आहेत त्याचा उपसंहार —
देवयान - शुक्ल गती - परत येत नाही.
पितृयान कृष्ण गती - पुन्हा परत येतो.

(२७) या दोन्ही गती जाणल्यावर योग्याने तटस्थ कसे रहावे —
या दोन्हींना तत्त्वतः जाणून घेतले तर योगी मोह पावत नाही. म्हणून हे अर्जुना, तू सर्वकाळी समत्वबुद्धीरूपी योगी हो.
शुक्ल गती - क्रममोक्षाची साधक
कृष्ण गती - पुनरावर्तन व दारुण संसार देणारी
याचे ज्ञान (यथार्थ) ज्याला होते तो कर्ममार्गात मुळीच शिरत नाही. सर्वदा ध्यानयोगामध्ये मग्न असतो. तो समाहितचित्त असतो त्याच्या चित्ताची स्थिरता व शांती अढळ असते.

(२८) योगी पुरुष या रहस्याला तत्त्वतः जाणून सर्वांना उल्लंघून जातो आणि सनातन परमपदाला पावतो. चार प्रकारची पुण्यफले आहेत ती जर ओलांडली (त्यागली) तरच मोक्षकाम होतो.

© www.madhaveeraghuveer.com

| December | | | | | | January '2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 | Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 | Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | | Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | | Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | | Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

2009

November
Tuesday
Week 46
314-051

# 10

१. वेदांचे विधिपूर्वक पठनादि करून प्राप्त होणारे पुण्य.
२. श्रद्धेने व यथासांग अनुष्ठिलेल्या यज्ञाने मिळणारे पुण्य
३. शास्त्रोक्तरीत्या एकाग्रचित्त व निश्चलबुद्धी करून आचरलेल्या तपाच्या सामर्थ्याने उद्भवणारे पुण्य
४. देश, काळ, पात्र यांच्या योग्यतेचा विचार करून दान दिल्याने उत्पन्न होणारे पुण्य.

ह्या सर्व पुण्यकर्मांपासून उद्भवणारे स्वर्गसुखादिरूप फळ - त्याचा त्याग करून जो वर्तन करतो त्या ध्याननिष्ठ योग्याला अत्युत्कृष्ट ऐश्वर्याचे स्थान जे ब्रह्म ते प्राप्त होते.

©www.madhaveeraghuveer.com

# 13 November Friday

Week 46
317-048

2009

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

9.00 श्री सद्गुरु महिमा।

10.00 दोगुरुत्व, मातृत्व
स्व, भक्तोप उदाहरण

11.00 गुरुची दोन पावले - सगुण, निर्गुण

12.00 आपण नेहमी म्हणतो ओम सद्गुरुत्वाचा अर्थ न

1.00 त्यांनी समजते

सद्गुरु आपल्या अंतर्यामीच व्यवस्थापन करीत

2.00 जागवतात, शिकवतात व करवून घेतात.

3.00 मी गुरूंचा आहे सांगा सार्थ अभिमान बाळगावा व त्यांचा

4.00 त्यांचा शिष्य मानले ... मार्ग आहे

5.00 शिष्य घडवून घेतात.

नरेंद्र - रामकृष्ण - पागल पुजारी

6.00

न बलं न जानामि

7.00

8.00

© www.madhaveeraghuveer.com